**नि. फौ. खटला क्र.११६/२०२२**

**निशाणी क्र.८७**

**:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०३ चा पुरावा ::**

**शपथेवर सत्य निवेदन करतो की,**

**माझे नांव** : गुंडू पुंडलिक शिंदे,

**वय** : ५५ वर्षे, **काम** : काही नाही,

**राहणार** : उदगीर, ता. उदगीर, जि. लातूर.

**:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::**

मी आरोपींना ओळखतो. त्यापैकी आजरोजी दयानंद, पुजा, विजयकुमार, सुवर्णा व गौतम हे हजर आहेत व ईतर आरोपी गैरहजर आहेत. (अर्ज नि.८६ वरील आदेशाप्रमाणे आरोपी क्र.४, ५ ८ व ९ यांची गैरहजेरी माफ केलेली आहे.) दि.२९/०५/२०२२ रोजी रात्री १२.३० वाजता येणकी येथे घटना घडली होती. त्यावेळी आम्ही झोपलेलो असताता आम्हाला भांडणाचा आवाज आला आणि पत्र्यावर दगड पडल्याचा आवाज ऐकू आला. त्यामुळे मी, नारायण पुंडा शिंदे, विठ्ठल पुंडा शिंदे असे मिळून सुकुमार गोविंद कांबळेच्या घरी गेलो. त्यावेळी दयानंद मारोती कांबळे हा सुकुमारला मारत होता. तेथे ईतर सर्व आरोपी हजर होते. त्यानंतर ते सुकुमारच्या घरात घुसले. तुम्हाला सर्वांना खतम करतो, शेत ताब्यात घेतो अशी आरोपी दयानंदने धमकी दिली होती. गौतमने राजाबाईला डाव्या पायाच्या गुडघ्यावर व बरगडीवर मारले. गौतम व विजयकुमार यांनी राजाबाईला लाथाबुक्क्यांनी मारले. आरोपी दयानंदने सुकुमारला काठीने मारले. आरोपी गौतमने राजाबाईच्या गळ्यातील मंगळसूत्र ओढून घेतले होते. आम्ही सोडवासोडव करण्याचा प्रयत्न केला. सर्व आरोपी घरामध्ये घुसले व त्यांनी माझा जबाब नोंदविला होता.

सरतपास पूर्ण.

**:: आरोपीकरिता उलटतपास अधिवक्ता श्री. बी.डी. पाटील यांच्यामार्फत ::**

०२. माझे शिक्षण झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला मराठी वाचता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला मराठी लिहिता येत नाही. वर्ष १९८० मध्ये प्रौढ शाळेमध्ये मी वाचणे शिकलो. माझ्या वडिलांना नरसिंग हा भाऊ आहे आणि दोन बहिणी होत्या. मला तीन भाऊ आहेत. विठ्ठल व नारायण हे माझे भाऊ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, कमळाबाईने माझ्याविरुध्द उदगीर न्यायालयामध्ये दिवाणी दावा दाखल केलेला आहे.

माझ्याकडे १ एकर ५ गुंठे जमीन आहे. आम्ही चारही भावांकडे एकूण ४ एकर २० गुंठे जमीन आहे. माझ्या वडिलांना सदर जमीन भावांसोबतच्या वाटणीमध्ये मिळाली. नरसिंगने त्यांचा हिस्सा आमच्या बाजूने सोडून दिला होता आणि नेत्रगाव येथे राहण्यास गेले होते.

०३. मारोती सुबाणा, बापू गोविंदा व जळबा भुताळे हे माझे नातेवाईक नाहीत. घटनास्थळी भरपूर लोक जमा झाले होते. परंतु त्याची संख्या मला सांगता येत नाही. मी नमूद घटनेच्या वेळी झोपलेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, पत्र्यावर दगड पडल्याचे मी खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, दयानंदने मारहाण केल्याचे आणि सर्वांना खतम करतो, शेत ताब्यात घेतो अशी धमकी दिल्याचे खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, गौतमने राजाबाईला डाव्या पायावर व बरगडीला मारल्याचे खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, गौतमने विजयकुमार व राबाईला लाथाबुक्क्यांनी मारल्याचे खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी दयानंदने सुकुमारला काठीने मारल्याचे मी खोटे सांगितले.हे म्हणणे खरे नाही की, आरोपी गौतमने राजाबाईचे मंगळसूत्र तोडल्याचे खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणतीही घटना बघितलेली नाही आणि सोडवासोडव केलेली नाही.

०४. हे म्हणणे खरे आहे की, मी आणि बारा लोकांनी शेतामध्ये मारहाण केल्याबाबत दयानंदने पोलीस ठाण्यामध्ये तक्रार केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी सदर फिर्याद मागे घेण्यासाठी मी आणि गोविंद कांबळे यांनी संगनमत केले व खोटी तक्रार केली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**.

दि.१३/०३/२०२६.